# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

गुरूवार, ९ ऑक्टोबर २०२५

# पाटण येथे आज प्रयोगशाळा, विस्तारित इमारतीचे उद्घाटन

## मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची उपस्थिती

**वार्ताहर**
पाटण

कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी. डी.कॉलेज पाटण येथे विविध नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीचा उद्घाटन समारंभ उद्घाटन गुरुवार ९ रोजी दुपारी २.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार अतुलबाबा भोसले तसेच पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर व मान्यवरांच्या उपस्थितीत यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी दिली.

प्राचार्य एस. डी. पवार यांनी सांगितले की, पाटण तालुक्यातील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये मिळणाऱ्या उच्च शिक्षणाच्या सुविधा आपल्या येथील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हाव्यात, या दूरदृष्टीकोनातून विविध नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. यामध्ये बी. कॉम. आय. टी., बी.सी.ए., बी.एससी.(कंप्युटर सायन्स इंटायर), एम. कॉम. आय. टी., एम.के.सी.एल. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांचा समावेश असून, यामार्फत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संगणक साक्षरता, तसेच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता येणार आहे. संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण तसेच मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. सोहळ्यासाठी शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी उपस्थित राहावे.